# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४७६/पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांक:- १/०९/२०१८

## ''२०१८ पावसाळी जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धाचे उद्‌घाटन ''

**भंडारा** :—आज दि. ०३/०९/२०१८ रोजी पोलीस मुख्यालय कवायत मैदानावर भंडारा जिल्हा पोलीस पावसाळी क्रिडा स्पर्धेचे मोठया आंनदमय वातावरण मान्यवरांच्या उपस्थितीत पोलीस शिपाई महेश नैताम यांचे हस्ते दिप प्रज्वलन करुन पो. क्रिडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. सदर कार्यक्रमाला मा. मुख्य न्याय दंडाधिकारी भंडारा प्रशांत हेमंत कर्वे, मा पोलीस अधिक्षक भंडारा विनीता साहू, मा. पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा बनडोपंत बनसोडे, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा जोगदंड, उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी तिक्कस, तसेच भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशनचे व शाखेचे अधिकारी व कर्मचारी हे कार्यक्रमाला उपस्थित होते. तसेच परेड संचालन राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री. के. प्रधान यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाला मा. विनीता साहू यांनी बोलतांना पोलीस कवायत मैदानात येथे सुरु होत असलेल्या भंडारा जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धेत चार पोलीस उपविभाग व पोलीस मुख्यालय अश्या पाच विभागाचा समावेश असेल. त्यामध्ये १५० महिला व पुरुष पोलीस खेळाडू यांनी सहभाग घेतला आहे. या स्पर्धेमध्ये फुटबॉल, हॉकी, हॅन्डबॉल, व्हॉलीबाल, बॉस्केटबॉल, कंबड्डी, खोखो या सांघीक खेळांचा समावेश असुन त्यामध्ये १००,२००, ४००, ८००, १५००, ५०००,१०००० १० किलोमीटर, ४०० किलो मीटर हरडेज, या खेळाचा समावेश असुन वैयक्तीक खेळ गोळाफेक, भालाफेक, थाडीफेक, साईड जंप लॉग जंम्प, टिप्पर जंम्प अश्या क्रिडा प्रकाराचा समावेश आहे. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या सर्व क्षेत्रात टिकायचे असेल तर तणावमुक्त जीवन आवश्यक आहे. परिस्थती नेहमी बदलत असते. सर्व क्षेत्रात टिकायचे असेल तर तणावमुक्ती जिवन पुढील क्षण आवश्यक आहे. परिस्थीती नेहमी बदलत असते. जसा आपल्याला वेळ मिळतो त्याचा आपण योग्य खेळाच्या माध्यमातुन पुरेपुर उपयोग केला पाहीजे. आपण आता काही दिवसा पुर्वी आशियाईन खेळात भारताने चांगला प्रतिसाद दिला आहे. त्याचप्रमाणे आपणही आपले मनाविरुध्द परिक्षेत्रीय, राज्यास्तरीय व राष्ट्रीय स्पर्धेमध्ये यश प्राप्त करावे. खेळाडूने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन आपल्या जिल्हयाचा नावलौकिक केला पाहीजे, असे मार्गदर्शन केले.

मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू यांनी पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देवुन मान्यवरांचे गौरव केला. याप्रसंगी २००मीटर धावण्याच्या प्रथम पुरुष स्पर्धेमध्ये महेश नैताम क्युआरटी भंडारा, व्दितीय राहुल फेन्डर यांनी तसेच महिला पोलीस शिपाई मध्ये प्रथम पुष्पा बोरकर, व व्दितीय विजया घोनमोडे यांनी क्रमांक पटकवला.

तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती स्मिता गालफाडे व श्रीमती आरती देशपांडे, मपोशि. योगीनी नागतोडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन मा. पोलीस उपअधिक्षक (गृह) बनडोपंत बनसोडे यांनी केले.

(जितेंद्र के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्रांचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.